REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 8 | MAY - 2026

# इयत्ता चौथीच्या मराठी विषयासाठी कार्यान्वित केलेल्या आकारिक मूल्यमापनाचा अभ्यास

**श्रीमती आरडले सोनाली भालचंद्र**
**जि.प.प्रा.शाळा, राजीव गांधी नगर, शिंगोली, धाराशिव.**

**प्रस्तावना :**



मुलांना वाचायला-लिहायला तर यावेच पण त्याच बरोबर त्यांना उत्तम बोलायला यावे, चांगले खेळायला यावे. त्यांनी सभोवतालच्या परिसरातील घटनांचे आणि वस्तूंचे निरीक्षण करून ज्ञान मिळवावे. हाताने विविध कामे करावीत, कलाकौशल्य शिकावित. विविध कलांचा आस्वाद घेण्यास शिकावे. त्यांचे व्यक्तिमत्व अनेकविध अंगानी बहरावे अशी अपेक्षा आहे. मुलांनी शिकता-शिकता आणि कृती करता-करता स्वतःचा शोध घेण्यास सुरूवात करावी. या शोधातून त्यांना स्वतः मधील निसर्गदत्त शक्तिस्थळे गवसावित आणि मग प्रत्येक मुलाने आवडीच्या क्षेत्रात उत्तुंग झेप घ्यावी अशा हेतूने मूल्यमापन पध्दती लागू केली आहे.

भारत सरकारने बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिकार अधिनियम २००९ ची अंमलबजावणी करताना कलम २९ (२) नुसार मूल्यमापनात बदल केला आहे. त्या अपेक्षांची परिपूर्ती करताना गेले दोन वर्षांपासून सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रियेत बदल घडवून आणला. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती संपूर्ण राज्यात सुरू केली. सातत्यूपण् सर्वंकष मूल्यमापनात आकारिक मूल्यमापनासाठी विविध तंत्राचा समावेश केला. त्यामुळे मूल्यमापन ताणतणावविरहित व आनंददायी बनेल या हेतूने या पद्धतींचा अवलंब करण्यात आला.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विविध अंगानी विकसित होत असताना निरीक्षणातून विद्यार्थ्यांचे शिकण्यासाठी धडपडणे, बोलणे, विचार व्यक्त करणे, त्याचे लिहिणे, त्याने दाखवलेले कल्पनाचातुर्य त्याचे चिकित्सक तसेच सर्जनशील विचार करणे या सर्व बाबींचा पडताळा सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीने घेता येतो. शिक्षकांनी दैनंदिन अध्ययन अध्यापनात अध्ययन अनुभव देत असताना आकारिक मूल्यमापन नकळत घडते. मूल्यांची रूजवणूक व जीवन कौशल्यांचा विकासही सहज साधता यावा या हेतूने सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीत आकारिक मूल्यमापनाचा समावेश करण्यात आला.

प्राथमिक शिक्षणामधून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शारीरिक, बौध्दिक व भावनिक अशा स्तरावरील क्षमता आणि कौशल्य यांचा विकास अपेक्षित असतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत असताना मूल्यमापनातून वेळोवेळी त्यांच्या अध्ययनातील त्रुटी अडचणी वेळच्यावेळी दूर होऊन त्यांची उत्तम शैक्षणिक प्रगती व्हावी अशी अपेक्षा असते.

**शीर्षक इयत्ता चौथीच्या मराठी विषयासाठी कार्यान्वित केलेल्या आकारिक मूल्यमापनाचा अभ्यास-:**

**उद्दिष्टे -:**

१. इयत्ता चौथीच्या मराठी विषयाच्या आकारिक मूल्यमापन पद्धतीचा व साधनांचा आढावा घेणे.
२. मराठी विषयाचे आकारिक मूल्यमापन करताना शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
३. आकारिक मूल्यमापन प्रक्रियेतून जाताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

४. आकारिक मूल्यमापनात येणाऱ्या अडचणीवर उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धतीची निवड :** प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती मधील शालेय सर्वेक्षण पद्धतीची निवड केलेली आहे.

**सशोधनाची साधने व तंत्रे निवड :-** सदरच्या संशोधनासाठी समस्येचे स्वरूप व उद्दिष्टे लक्षात घेवून प्रश्नावली या साधनाची व मुलाखत व मतावली या तंत्राची निवड संशोधनासाठी केली आहे.

**संशोधनासाठी नमुना निवड :-** प्रस्तुत संशोधनासाठी मोहोळ तालुक्यातील मराठी माध्यमाच्या २० जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची निवड लॉटरी पध्दतीने केलेली आहे. तसेच त्या शाळेमधील इयत्ता चौथीच्या वर्गाला मराठी शिकविणाऱ्या २० शिक्षकांची निवड केलेली आहे.

**निष्कर्ष :**

1. सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापनाचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांचे प्रमाण १०० टक्के आहे. प्रशिक्षणातून अल्प प्रमाणात संकल्पना स्पष्ट झालेले आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४० आहे.
2. प्रशिक्षणातून आकारिक मूल्यमापनाबाबत नोंदीविषयक अधिक स्पष्ट होणे गरजेचे आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ५५ टक्के आहे. तर तोंडी व प्रात्यक्षिक मूल्यमापन अधिक स्पष्ट होणे गरजेचे आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ३५ टक्के आहे.
3. इ. ४ थी मराठी विषयाच्या आकारिक मूल्यमापनामध्ये पाच साधनतंत्रे वापरली आहोत असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ७५ टक्के आहे. दैनिक टाचण वहीमध्ये वापरलेल्या साधन तंत्रांची काही प्रमाणात नोंद घेतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४० टक्के आहे.
4. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये मार्गदर्शनाप्रमाणे पूर्णपणे कार्यवाही सुरू आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ६५ टक्के आहे. प्रगती पत्रकामध्ये विशेष प्रगती, आवड, छंद, सुधारणा यांच्या आवश्यक नोंदी काही प्रमाणात घेतल्या आहेत असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४५ टक्के आहे.
5. विद्यार्थ्यांची विद्यार्थी संचिका तयार केली आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ३० टक्के आहे.
6. अतिरिक्त पूरक मार्गदर्शन अल्प प्रमाणात करतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४० टक्के आहे.
7. श्रेणी पद्धतींचा फायदा सहकार्यात्मक अध्ययनासाठी होतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ३५ टक्के आहे.
8. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामध्ये संविधानातील मूल्ये, गाभा घटक, जीवन कौशल्ये यांचा मूल्यमापनामध्ये पूर्ण विचार होतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४५ टक्के आहे.
9. मराठी विषयांसाठी स्वतंत्र प्रश्नपेढी काही प्रमाणात तयार केले आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४५ टक्के आहे. प्रश्नपेढीत जास्तीत जास्त रिकाम्या जागा भरा हा प्रश्नाचा संग्रह अधिक केला जातो असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ३५ टक्के आहे. तर प्रश्न निर्मिती कौशल्याची म.रा.शै.सं.प्र.परिषद, पुणे यांनी प्रकाशित केलेली पुस्तिका वापरत नाही असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ६० टक्के आहे. शाळेमध्ये इ. ४ थी साठी शिक्षकांनी विषयनिहाय प्रश्नपेढी तयार केली नाही असे म्हणणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ६० टक्के आहे.
10. सत्र परीक्षेची प्रश्नपत्रिका मुख्याध्यापक संघ तयार करतात असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ५० टक्के आहे. तर शिक्षक आपल्या विषयाची प्रश्नपत्रिका स्वतः काढतात असे म्हणणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ६० टक्के आहे येथे मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या मतामध्ये भिन्नता आढळते.
11. सर्जनशील प्रतिसादांना वाव देणाऱ्या प्रश्नांचा समावेश प्रश्नपत्रिकेत करत नाही असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ७० टक्के आहे. उपयोजन उद्दिष्टांसाठी दिर्घोत्तरी प्रकारचे प्रश्न प्रश्नपत्रिकेत टाकतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४५ टक्के आहे.
12. प्रकल्प कार्यवाहीसाठी शिक्षक विद्यार्थ्यांना आवश्यक त्या प्रसंगी प्रसंगानुरुप मार्गदर्शन किंवा सहकार्य करुन अधून मधून कार्यवाहीचा आढावा काही प्रमाणात घेतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४५ टक्के आहे. चित्रे गोळा करण्याचे प्रकल्प केले आहेत असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ३७ टक्के आहे तर चाचणी परीक्षा घेतले आहे असे म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ८५ टक्के आहे.

13. इ. ४थी मराठी विषयाच्या आकारिक मूल्यमापनामध्ये वैयक्तिक नोंदी ठेवणे अडचणींचे वाटते असे ४० टक्के शिक्षकांचे प्रमाण आहे.
14. कार्यवाहीत नोंदीविषयक बाबी अडचणीच्या वाटतात असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ६० टक्के आहे.
15. पुस्तकसह चाचणी घेताना पुरेशा प्रमाणात अडचणी येतात असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ५५ टक्के आहे.
16. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनातील आकारिक मूल्यमापन अध्ययन-अध्यापन विषयक अडचणी जाणवतात असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण ४० टक्के आहे.
17. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनातील आकारिक मूल्यमापन करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रशिक्षणाचा दर्जा सुधारावा आणि मूल्यमापन पध्दतीत सुधारणा करावे असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण प्रत्येकी ३५ टक्के आहे.
18. परीक्षा घेताना छपाईत अडचणी येतात असे म्हणणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ५० टक्के आहे.
19. शिक्षक करत असलेल्या नोंदी विशेष स्वरूपाचे नोंदी असतात असे म्हणणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३० टक्के आहे, तर सर्वसामान्य नोंदी स्वरूपाचे असतात असे म्हणणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ४५ टक्के आहे.

## शिफारशी :

1. शिक्षकांनी विद्यार्थी मूल्यमापन करताना सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीच्या निकषानुसार करावे.
2. शासनास अपेक्षित पध्दतीने मूल्यमापन करण्यासाठी प्रशिक्षण दरम्यान दिलेल्या संदर्भ पुस्तिकांचा योग्य तो वापर करावा. गरजेनुरूप सातत्याने वाचन व्हावे.
3. प्रशिक्षणामध्ये आपल्या शंका मांडून चर्चात्मक पध्दतीने त्यांचे समाधान करावे.
4. प्रशिक्षण कालावधीमध्ये शिक्षकांना शंका समाधानासाठी स्वतंत्र व पुरेसा वेळ द्यावा.
5. प्रशिक्षण कालावधीमध्ये शंका पेटी केंद्र किवा बीट स्तरावर ठेवावी. तसेच नेहमीच्या वेळी श्ंका पेटी केंद्र शाळेत ठेवावे व केंद्रसंमेलनातून त्या समस्या सोडविल्या जाव्या.
6. प्रशिक्षणार्थी शिक्षकांना देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक पुस्तिकांबरोंबर ऑडिओ कॅसेट उपलब्ध करुन द्याव्यात.
7. शिक्षकांच्या शंका समाधानासाठी तालुकास्तरावर स्वतंत्र कक्ष नेमावा.
8. सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापन पध्दतीच्या कामकाजाबाबत आदर्श शाळांना भेटी देण्यासाठी शिक्षकांना ऑन ड्युटी परवानगी मिळावी.
9. उत्तम काम करणाऱ्या शिक्षकांचे कौतुक व्हावे व त्यांच्या कामास प्रसिध्दी मिळण्याच्या दृष्टिकोनातून एक व्यासपीठ निर्माण व्हावे.
10. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची उत्कृष्ट अंमलबजावणी असलेल्या शाळा, त्यांच्या नोंदीनुसार विद्यार्थी पडताळा, साधनतंत्र निवड व वापर यासारख्या सर्व बाबींचे मार्गदर्शन तज्ज्ञांकडून व्हावे. तसेच त्यांच्या मार्गदर्शनाची VCD प्रत्येक शाळेत पुरवावी.

## संदर्भ सूची

1. आगलावे,प्रदीप. (२०००). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे. नागपूर : विद्या प्रकाशन.
2. कायंदे - पाटील, गंगाधर वि. (२००६). संशोधन पध्दती. तृतीय आवृती. नाशिक : चैतन्य पब्लिकेशन्स.
3. करंदीकर सुरेश. (१९९६). मराठी अध्यापन पध्दती. कोल्हापूर : फडके प्रकाशन.
4. कुंडले म.बा. (१९९१). मराठीचे अध्यापन. पुणे : श्री विद्या प्रकाशन.
5. दुनाखे अरविंद (२००७). मराठीचे आशययुक्त अध्यापन. पुणे : नित्यनूतन प्रकाशन.
6. संपादक . म.रा.शै.सं. व प्र. परिषद, (२०१०) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शिका भाग १-४, पुणे (विदया परिषद)